वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३२ | अंक-२ | किंमत : रु. ३०/- | फेब्रुवारी २०२४

## आयुष्यमान भव ! शतायुषी भव !! यशस्वी भव !!!




आदरणीय ना. मा. एकनाथजी शिंदेसाहेब (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांना
वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना

फेस्कॉम अध्यक्ष श्री. अरुण रोडे व उपाध्यक्ष श्री. आण्णासाहेब टेकाळे

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)

महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी तळमळीने कार्य करणाऱ्या,
ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेणारे

आदर्शवत मुख्यमंत्री

## मा. नामदार श्री. एकनाथरावजी शिंदेसाहेब

यांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी अभिष्टचिंतन




**शुभेच्छुक**

**श्री. अरुण रोडे**
अध्यक्ष

**श्री. आण्णासाहेब टेकाळे**
उपाध्यक्ष

**श्री. विवेक देशपांडे**
मुख्य सचिव

**श्री. विजय औंधे**
उपाध्यक्ष, मुख्यालय

**श्री. अंजुमन खान**
उपाध्यक्ष व प्रमुख मनोयुवा कौन्सिल

**श्री. विनायक पांडे**
अति. मुख्य सचिव

**श्री. चंद्रकांत साळवेकर**
कोषाध्यक्ष

**श्री. आण्णासाहेब दानोळे**
अति. कोषाध्यक्ष

**श्री. सुरेश पवार**
संपर्क सचिव

## आरोग्य सेवा संचालनालय

दि. २२-६-२००१

प्रति,

१) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, ..........

२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ..........

विषय : ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय धोरण सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची कृती योजना.

संदर्भ : शासनाचे पत्र क्र. संकिर्ण - १०.००/२१५७/आरोग्य-३, दि. ३० नोव्हेंबर, २०००.

सद्यःस्थितीत वैद्यकिय क्षेत्रात झालेली प्रगती व त्यामुळे साथी रोग व इतर आजारांवर केलेली मात यामुळे एकंदरीत जीवमान उंचावले आहे. बालमृत्यु मध्ये व अकाली मृत्युमध्ये लक्षणीय घट झालेली आहे. त्यामुळे एकंदरीत आयुष्यमानात वाढझालेली आहे. पर्यायाने ज्येष्ठ नागरिकांचे एकंदर समाजात असणाऱ्या संख्येत वाढहोत आहे. सध्याची कौटुंबिक व्यवस्था ही एकत्रित कुटुंब पद्धतीकडून विभक्त कुटुंब पद्धतीकडे चालली असल्याने ज्येष्ठ नागरिकांवार त्यांचा अतिशय ताण पडत आहे. आपल्या पाल्यांकडून उतार वयात योग्य ती काळजी घेतली जाईल किंवा नाही या विवंचनेत हा घटक वावरत आहे.

ज्येष्ठ नागरिकांनी त्यांची उमेदीची वर्षे ही कुटुंबासाठी, राज्यासाठी व देशासाठी खर्ची घातलेली असतात. त्यामुळे वृद्धापकाळात त्यांचे जीवन सुसह्य व्हावे यासाठीं केंद्र शासन व राज्य शासनाने निश्चित असे धोरण ठरवून विविध कल्याणकारी योजनांचा समावेश त्यामध्ये करावयाचा ठरविलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांना आरोग्य सुविधा पुरविणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. जिल्हा शल्य चिकित्सकांनी आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व शासकीय, ग्रामीण / कुटीर रुग्णालयांना सदर सूचना द्याव्यात. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनाही आपल्या अधिपत्याखालील प्राथमिक आरोग्य केंद्र / प्राथमिक आरोग्य पथके / जिल्हा परिषद दवाखान्याचे वैद्यकिय अधिक्षक यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात, सदर सूचनांचे काटेकोरपणे पालक करावे. आपल्या रुग्णालयातदेखील सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. जेणेकरुन सदर अहवाल शासनास सादर करणे सुलभ होईल.

१) राज्य शासनामार्फत ग्राम पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालयामार्फत आबालवृद्धांसाठी बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सुविधा पुरविण्यात येतात. यचा सार्वजनिक रुग्णालयात वृद्धांना रांगेत ताटकळत ठेवले जाऊ नये यासाठी केस पेपर काढण्यासाठी व औषध देण्यासाठी स्वतंत्र खिडकीची अथवा रांगेची व्यवस्था करावी व तसा फलक तिथे लावावा.

२) आपल्या रुग्णालयामध्ये वृद्धांना प्राधान्याने भरती करण्याबाबतच्या सूचना संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

३) वार्धक्यामध्ये मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग, प्रोस्टेट वृद्धि, मोतीबिंदु, कर्करोग, हाडांचे व मणक्यांचे विकार, इत्यादी आजार बळावतात. या आजारांच्या विविध चाचणीसाठी व उपचारासाठी जिल्हा रुग्णालये व वैद्यकिय महाविद्यालये यामध्येच सोयी उपलब्ध आहेत. ही बाब लक्षात घेता या रुग्णांना आपल्या रुग्णालयात तसेच संबंधित वैद्यकिय महाविद्यालयात प्राधान्याने उपचार करणेबाबत कार्यवाही करावी. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन या रुग्णांना योग्य तऱ्हेने संदर्भ सेवा देण्याबाबत संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांना सूचित करावे.

४) दिवसेंदिवस वृद्धांची संख्या ज्या प्रमाणात वाढत आहे, त्या प्रमाणातच वार्धक्यामुळे होणारे आजार यांचीही संख्या वाढत आहे. यासाठी "वार्धक्य शास्त्रात" या विषयाबाबत जास्तीत जास्त वैद्यकिय व्यावसायिकांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने या विषयीचा पदव्युत्तर अभ्यासक्रम वैद्यकिय महाविद्यालयामार्फत सुरु करण्यासाठी संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना विनंती करण्यात येत आहे. वार्धक्य शास्त्राबाबत प्राथमिक आरोग्य केंद्र वा ग्रामीण रुग्णालय येथे काम करणाऱ्या डॉक्टर्स व परिचारिकांना अधिक माहिती प्राप्त करुन देण्यासाठी शॉर्ट टर्म प्रशिक्षण आरोग्य सेवा संचालनालयामार्फत आयोजित करण्यांत येईल.

५) वृद्धापकाळात उपस्थित होणारे विविध आजार लक्षात घेता केवळ वृद्धांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र / ग्रामीण रुग्णालय स्तरावर खास रोग निदान शिबीरे तसेच सर्व जिल्हा रुग्णालयात आठवड्यातून ठराविक दिवशी दुपारी वृद्धांसाठी बाह्यरुग्णोपचार चिकित्सा विभाग सुरु करण्यात यावा. रोग निदान शिबीरांसाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था त्यात काम करणारे तज्ञ डॉक्टर्स तसेच जिल्हा पातळीवर काम करणारे तज्ञ डॉक्टर्स यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित स्थानिक स्वयंसेवी संस्थांना विनंती करावी. या शिबीरात रोग निदान, आवश्यक त्या रुग्णावर जागीच उपचार, गंभीर स्वरुपाचे आजारासाठी योग्य ती सेवा देण्यात यावी. तसेच या शिबीरात ज्येष्ठ नागरिकांना समतोल आहार, व्यायाम, योगाभ्यास, आरोग्य प्रद सवयी, विश्रांती व मनोरंजन याबाबत आरोग्य शिक्षण विविध तज्ञांमार्फत देण्यात यावे.

६) ज्येष्ठ नागरिकांमध्ये कौटुंबिक ताणतणावामुळे विविध मानसिक समस्या उद्भवतात. यातील बऱ्याचशा समस्या ह्या योग्य तो सल्ला वा मार्गदर्शनानंतर सोडविण्यासारख्या असतात. यासाठी जिल्हा स्तरावर उपलब्ध असणारे मानसोपचार तज्ञांच्या सेवा उपलब्ध करण्यात याव्यात. गंभीर स्वरुपाचे मानसिक विकार असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रादेशिक मनोरुग्णालयात प्राधान्याने रुग्णांना दाखल करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. येथील तज्ञांच्या सेवा जिल्ह्यातील इतर आरोग्य संस्थांमधूनही निश्चित भेटी दिवस ठरविण्यात यावेत.

७) खाजगी / स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य वैद्यकिय सुविधा देणाऱ्या संस्था / रुग्णालये / ट्रस्ट यांना ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक सवलती देण्याबाबत आवाहन करण्यात यावे. तसेच खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांनाही ज्येष्ठ नागरिकांच्या फी मध्ये सवलत देणेबाबत आवाहन करावे.

८) वार्धक्यातून उद्भवणारे आजार हे ठराविक स्वरुपाचे असतात. त्यातील मधुमेह, हृदयविकार, इत्यादी आजारांबाबत योग्य तो आहार आरोग्य प्रद सवयी, नियमित वैद्यकिय तपासणी याद्वारे आजार आटोक्यात ठेवणे शक्य होते. वार्धक्यात उद्भवणाऱ्या विविध आजारांसाठी जुजबी माहिती, संबंधित आजारांवर घ्यावयाची काळजी यासंबंधीची माहिती छोट्या पुस्तिकेद्वारे उपलब्ध करणे सहज शक्य आहे. तसेच या आजारांबाबत पोस्टर्स, परिपत्रके, इत्यादी माध्यमाद्वारे ही या संचालनालयाकडून माहिती देण्यात येत असते. या उपक्रमात वाढकरुन व प्राधान्याने ही माहिती ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करावी.

९) गरीब वृद्धांसाठी निःशुल्क उपचार व औषधासाठी कल्याणनिधी उभारण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्यांसाठी "फेडरेशन ऑफ सिनियर सिटिझन्स् ऑर्गनायझेशन" (फेस्कॉम) या सारख्या संस्थांचे सहकार्य घ्यावे.

महासंचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.

----------

**राज्यातील वरिष्ठ नागरिकांना**
**शासकिय रुग्णालयातून विनाशुल्क सेवा देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक एमएजी २००४ / १३८ / प्र.क्र. २० / आरोग्य - ३**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**दिनांक - २१ जुलै, २००४.**

वाचा : १) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांक एचएफआहर १०८७/३६५३/आरोग्य-९, दिनांक २/२/१९८८
२) शासन निर्णय, सा.आ.वि. क्र. जीरुफी-१०००/प्रक्र १०/आरोग्य-३, दिनांक १० जुलै, २००१
३) संचालनालय, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्रमांक संआसे/ज्येष्ठ नागरिक/सुविधा/कक्ष-३ब/०४, दिनांक २७ जानेवारी, २००४
४) शासन निर्णय, सा.आ.वि.क्र.बीबुडी २००४/प्रक्र १७२/अर्थसंकल्प, दिनांक १४ जुलै २००४

**प्रस्तावना :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ तेथील शासन निर्णयान्वये शासकिय रुग्णालयातून देण्यात येणाऱ्या विविध रुग्णसेवेकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तथापि या शुल्क आकारणीतून वरील शासन निर्णय सोबतच्या परिशिष्ट "अ" येथील नमूद संवर्गातील व्यक्ती / लाभधारकांना रुग्णसेवा शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. राष्ट्रीय वरिष्ठ नागरिक धोरणाच्या अनुषंगाने व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने राज्यातील वरिष्ठ नागरिकांचा (वय ६० वर्ष आणि त्यावरील) समावेश या संवर्गात करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :** सामाजिक न्यायाच्या दृष्टीने राज्यातील वरिष्ठ नागरिकांना (वय ६० वर्ष व त्यावरील) शासकिय रुग्णालयात विनाशुल्क उपचाराची सवलत देण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. यास अनुसरुन:

(१) संदर्भाधीन क्रमांक २ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील शासकिय रुग्णालयात विनाशुल्क वैद्यकिय उपचारांची सवलत मिळत असलेल्या संवर्गाच्या यादीत अनुक्रमांक १५ येथे "वरिष्ठ नागरिक (वय ६० वर्षे व त्यावरील)" संवर्गाचा समावेश करण्यात येत आहे.

(२) प्रस्तुत सवलत हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू राहील.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३८/०४/व्यय-१३, दिनांक १८ जून २००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. क. प्रधान)
उप-सचिव, महाराष्ट्र शासन

----------

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मफुयो- २०२३/ प्र.क्र.१६०/ आरोग्य ६**
जी. टी. रुग्णालय आवार, १० मजला
मंत्रालय, मुंबई
**दिनांक: २८जुलै, २०२३**

**वाचा :-**

१) सा. आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र. रागांयो-२०१०/प्र.क्र.२४०/आरोग्य-६, दि. ३१ मे, २०११
२) सा. आ. विभाग, शासन निर्णय क्र. मफुयो-२०१६/प्र.क्र.३३१/आरोग्य-६, दि. १२ ऑगस्ट, २०१६
३) सा. आ. विभाग, शासन निर्णय क्र. रागांयो-२०१६/प्र.क्र.२०३/आरोग्य-६, दि.१६ सप्टेंबर, २०१६
४) सा. आ. विभाग,शासन निर्णय क्र. रागांयो-२०१६/प्र.क्र.६४/आरोग्य -६, दि. १३ एप्रिल, २०१७
५) सा आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र. रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६,दि.२१ सप्टेंबर,२०१८
६) सा. आ. विभाग,शासन निर्णय क्र. रास्वयो-२०१८ /प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९
७) सा. आ. विभाग,शासन निर्णय क्र. रअयो-२०१६/प्र.क्र.२६०/आरोग्य-६, दि.१४ ऑक्टोबर,२०२०
८) सा. आ. विभाग,शासन निर्णय क्र. मफुयो-२०२०/प्र.क्र.१५३/आरोग्य-६, दि.१४ डिसेंबर,२०२०
९) सा. आ. विभाग,शासन निर्णय क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.९९/आरोग्य-६, दि.२३ मार्च,२०२३
१०) मा.मंत्रिमंडळ सचिव यांचे दिनांक ०४.०७.२०२३ चे पृष्ठांकन (मंत्रिमंडळ बैठक दि. २८.०६.२०२३, विषय क्रमांक ५, कार्यवृत्त)

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना दि. २ जुलै, २०१२ पासून राज्यात राबविण्यात येत आहे, तर आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र शासनाची आरोग्य विमा योजना असून दि. २३ सप्टेंबर, २०१८ पासून राज्यात लागू करण्यात आली. दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी सांगड घालून दोन्ही योजना राज्यात एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सुधारीत योजनेची दि. ०१.०४.२०२० पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यमान महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेत काही बदल व योजनेचे विस्तारीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. १) सध्या आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत (PMJAY) आरोग्य संरक्षण प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्ष एवढे आहे तर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत (MJPJAY) आरोग्य संरक्षण प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. १.५ लक्ष एवढे आहे. आता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गतही आरोग्य संरक्षण प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्ष एवढे करण्यात येत आहे.

२) सध्या मुत्रपिंड शस्त्रक्रियेसाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये उपचार खर्च मर्यादा प्रति रुग्ण रु. २.५ लक्ष एवढी आहे, ती आता रु. ४.५० लक्ष एवढी करण्यात येत आहे.

३) सध्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये १२०९ उपचार आहेत. यापैकी मागणी नसलेले १८१ उपचार वगळण्यात येत आहेत. तर ३२८ मागणी असलेल्या नवीन उपचारांचा समावेश करण्यात येत आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये एकूण उपचार संख्येत १४७ ने वाढ होऊन उपचार संख्या १३५६ एवढी करण्यात येत आहे व १३५६ एवढेच उपचार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील उपचार संख्या ३६० ने वाढविण्यात येत आहे. सदर १३५६ उपचारांपैकी ११९ उपचार केवळ शासकीय रुग्णालयांसाठी राखीव राहतील. (परिशिष्टे २ ते ५ जोडली आहेत.)

४) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेमध्ये अंगीकृत रुग्णालयांची संख्या १००० एवढी आहे. सदर योजना याआधीच महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागात लागू करुन सीमा लगतच्या महाराष्ट्रातील ८ जिल्हयात १४० व सीमेलगतच्या कर्नाटक राज्यातील ४ जिल्ह्यात १० अतिरिक्त रुग्णालय अंगीकृत करण्याचा निर्णय झाला आहे. त्या व्यतिरिक्त २०० रुग्णालये अंगीकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. म्हणजे आता अंगीकृत रुग्णालयांची संख्या १३५० होईल. याशिवाय सर्व शासकीय रुग्णालये या योजेमध्ये अंगीकृत करण्यात येतील.

५) वरील (४) मध्ये नमूद रुग्णालयांव्यतिरिक्त यापुढे मागास भागात नव्याने सुरू होणारी सर्व रुग्णालये, अशा रुग्णालयांची ईच्छा असल्यास या एकत्रित योजनेमध्ये अंगीकृत करण्यात येतील.

६) आता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबे व अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबांना लागू करण्यात येत आहे.

७) स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेच्या दिनांक १४.१०.२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीमध्ये सुधारणा करुन रस्ते अपघातासाठीची उपचारांची संख्या ७४ वरुन १८४ अशी वाढविण्यात येत आहे. तसेच उपचाराची खर्च मर्यादा रु. ३०,०००/- ऐवजी प्रति रुग्ण प्रति अपघात रु. १ लक्ष एवढी करण्यात येत आहे आणि या योजनेचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत करण्यात येत आहे. सदर लाभार्थ्यांचा समावेश गट "ड" मध्ये करण्यात येत आहे. यामध्ये लाभार्थ्यांच्या "अ" "ब" व "क" या गटांमध्ये समाविष्ट न होणारे महाराष्ट्र सीमा भागातील रस्ते अपघातात जखमी झालेले महाराष्ट्राबाहेरील/ देशाबाहेरील रुग्ण यांचा समावेश करण्यात येत आहे.

८) सदर योजना संपूर्णपणे हमी तत्वावर राबविण्यात येईल म्हणजे उपचाराचा जो खर्च होईल तो राज्य आरोग्य हमी सोसायटी थेट अंगीकृत रुग्णालयांना प्रदान करेल. संपूर्णपणे हमी तत्वावर राबवण्याची यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत सध्याच्या पद्धतीनुसार (विमा आणि हमी तत्वावर) मात्र वरील १ ते ७ येथील सुधारित तरतूदींनुसार योजना राबविण्यात येईल.

९) शासकीय रुग्णालयांना या योजनेतून मिळणारा पैसा संबंधित रुग्णालयांकडेच ठेवण्यास परवानगी देण्यात येईल. यासंबंधातील सविस्तर आदेश नंतर निर्गमित करण्यात येतील.

२. **लाभार्थी घटक :-** महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी घटक पुढीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | बाब | आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना | महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना | |
|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थी घटक | सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेत (SECC) नोंदीत समाविष्ट कुटुंबे. अंत्योदय अन्न योजनेतील कुटुंबे. तसेच याशिवाय राज्य शासनाने शिफारस केल्यानूसार केंद्र शासनाने निश्चित केलेली कुटुंबे. | गट अ | पिवळी, अन्नपूर्णा योजना आणि केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबे. |
| | | | गट ब | शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबे (शासकीय /निमशासकीय कर्मचारी यासह) व कोणत्याही प्रकारची शिधापत्रिकाधारक नसलेली कुटुंबे यामध्ये राज्यातील शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांचाही समावेश होईल. |
| | | | गट क | गट -अ व गट -ब मध्ये समाविष्ट न होणारे पुढील घटक शासकीय /शासनमान्य आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय /शासनमान्य अनाथाश्रमातील मुले, शासकीय /शासनमान्य महिला आश्रमातील महिला, शासकीय /शासनमान्य वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक , माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांच्यावर अवलंबून असलेले कुटुंबातील सदस्य व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी जिवित महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी असलेले बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे. |
| | | | गट ड | लाभार्थ्यांच्या "अ","ब","क" या गटामध्ये समाविष्ट न होणारे महाराष्ट्र सीमा भागातील रस्ते अपघातात जखमी झालेले महाराष्ट्राबाहेरील व देशाबाहेरील रुग्ण. |
| | | | टीप १: तथापि **गट-ड** मधील लाभार्थ्यांकरीता आरोग्य संरक्षण हे प्रति रुग्ण प्रति अपघात रु. १ लक्ष एवढे राहील. | |
| | | टीप २ - राज्यातील कुटुंबे प्रथमतः आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी आहेत किंवा कसे, याची तपासणी केली जाईल. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समाविष्ट न होणाऱ्या लाभार्थ्यांचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत केला जाईल. | | |
| २ | लाभार्थ्यांची ओळख | **आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना** | **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना** | |
| | | वर १ येथे नमूद केलेल्या लाभार्थी घटकांमधील लाभार्थ्यांना लाभार्थी ओळख प्रणाली अंतर्गत ई-कार्डस वितरीत करुन त्याव्दारे ओळख पटविली जाईल. | गट अ | शिधापत्रिका व फोटो ओळखपत्र |
| | | | गट ब | शुभ्र शिधापत्रिका किंवा शिधापत्रिका नसेल तर अधिवास दाखला/तहसीलदार दाखला व फोटो ओळखपत्र, शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांकडून योजनेच्या लाभाची व्दिरुक्ती टाळण्यासाठी कोणत्याही शासकीय आरोग्य योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबतचे "स्व-घोषणापत्र" घेण्यात यावे. |
| | | | गट क | संबंधित संस्थेने दिलेले ओळखपत्र व फोटो ओळखपत्र |

| अ.क्र. | बाब | आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना | महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना | |
|---|---|---|---|---|
| | | | गट ड | १) अपघातग्रस्त व्यक्तीचा रुग्णालयातील जीओ टॅगींग फोटो<br>२) रुग्णालयांना पोलीसांनी कळविलेला फोटो<br>३) आधार कार्ड, मतदार कार्ड व पॅन कार्ड यापैकी एक फोटो ओळखपत्र. |
| ४ | दावे सादर करण्याचा व प्रदानाचा कालावधी | अंगीकृत रुग्णालयाने रुग्णास सुट्टी दिल्यानंतर ११ व्या दिवसापासून राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे दावे सादर करणे आवश्यक राहील. रुग्णालयांनी सादर केलेल्या दाव्यांची वैधता तपासून १५ कार्यालयीन दिवसांमध्ये राज्य आरोग्य हमी सोसायटीने दाव्यांची रक्कम संबंधित अंगीकृत रुग्णालयांना अदा करणे आवश्यक राहील. | | |
| ५ | संगणक प्रणाली व कॉल सेंटर | एकत्रित योजनेची संगणक प्रणाली व कॉल सेंटरचे कार्यान्वियन व सनियंत्रण राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत केली जाईल. यासाठी विहीत पध्दतीने सेवा पुरवठादाराची निवड करण्यात येईल व याकरिता होणारा खर्च सोसायटीच्या प्रशासकीय अनुदानातून केला जाईल. | | |
| ६ | अंमलबजावणी सहाय्य संस्थांची निवड | अंमलबजावणी सहाय्य संस्थांची निवड राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल. लाभार्थ्यांची नोंदणी, उपचारांना पूर्वमान्यता व दाव्यांची तपासणी इत्यादी कामे अंमलबजावणी सहाय्य संस्थेकडून करण्यात येईल. अंमलबजावणी सहाय्य संस्थांना देण्यात येणारे दावे तपासणीचे शुल्क सोसायटीच्या मान्यतेने प्रदान करण्यात येईल. | | |
| ७ | आरोग्य मित्र व इतर मनुष्यबळाची नियुक्ती | दोन्ही योजनांचे राज्य व जिल्हा स्तरावर कार्यान्वियन करण्याकरिता अंमलबजावणी सहाय्य संस्थेकडून राज्याच्या प्रकल्प कार्यालयात व जिल्हा स्तरावर आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात येईल तसेच प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात किमान एका आरोग्य मित्राची नियुक्ती अंमलबजावणी सहाय्य संस्थेकडून करण्यात येईल. | | |
| ८ | योजनेची प्रसिध्दी | राज्य शासनाच्या धोरणानुसार योजनेचा प्रचार व प्रसिध्दी माहिती व जनसंपर्क महासंचालनाकडून करण्यात येईल, तथापि याकरिता आवश्यक खर्च राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून भागविला जाईल. | | |

**३.** महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यामध्ये लाभार्थी वेगवेगळे आहेत. लाभार्थ्यांची द्विरुक्ती टाळण्यासाठी (एका कुटुंबाचा समावेश दोन्ही योजनांमाध्ये होणार नाही यासाठी) लाभार्थ्यांच्या यादीची राज्य आरोग्य हमी सोसायटीने वर्षातून दोनदा पडताळणी करावी.

**४. समित्याः-** प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यासाठी संदर्भाधिन क्र. ९ येथील दिनांक २३ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषद गठीत करण्यास आली आहे. तथापि, दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी योजनेत उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व महत्त्वपूर्ण बाबींवर तातडीने निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सनियंत्रण व कार्यकारी समिती तसेच राज्य स्तरावर समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समिती, अंतिम दावे निराकरण समिती, राज्य तक्रार निवारण समिती व जिल्हास्तरावर जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती अशा समित्यांचे संदर्भाधीन दि. २६.०२.२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या **" परिशिष्ट -१"** नुसार गठन करण्यात आलेले आहे. सदर समित्या यापुढेही कार्यरत राहतील. सदर समित्या यासोबतच्या "परिशिष्ट -१" मध्ये उद्धृत करण्यात येत आहेत. राज्य सनियंत्रण व कार्यकारी समितीची बैठक तीन

महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात करण्यात येईल. तर एका वर्षात नियामक परिषदेच्या किमान दोन बैठका आयोजित करण्यात येतील.

५. **वित्तीय भार :-** प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) योजनेंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा ६० टक्के व राज्य शासनाचा हिस्सा ४० टक्के राहील. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या हिश्यापोटी आवश्यक निधी व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पामध्ये आवश्यक निधी / अतिरिक्त अनुदान सर्वसाधारण (General), अनुसूचित जाती उप योजनेंतर्गत (SCP) व अनुसूचित जमाती उप योजनेंतर्गत (TSP) राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

६. **रूग्णालयांचे अंगीकरण :-** प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात येणाऱ्या रुग्णालयांची प्रत्येक तालुक्यात किमान २ रूग्णालये याप्रमाणे महसूली विभाग निहाय संख्या निश्चित करण्याचे, राज्याच्या सर्व महसुल विभागात एकसमान पध्दतीने रुग्णालयांचे जाळे तयार करणे इ. बाबत निर्णय घेण्याचे अधिकार सचिव/प्रधान सचिव/ अ.मु.स., सार्वजनिक आरोग्य विभाग यांना राहील.

७. **उपचार :-** प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या एकूण उपचारांची संख्या निश्चित करणे, उपचारांच्या संख्येत बदल करण्याचे (कमी/जास्त), वर्णनात व दरात बदल करण्याचे व काही उपचार शासकीय रुग्णालयांसाठी राखीव ठेवण्याचे अधिकार सचिव/प्रधान सचिव/अ.मु.स.,सार्वजनिक आरोग्य विभाग यांना राहतील.

८. **योजनेतील रूग्णालये:-** सदर योजनांसाठी राज्य आरोग्य हमी सोसायटी/ सचिव/ प्रधान सचिव/ अप्पर मुख्य सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग निश्चित करतील अशा निकषांनुसार खाजगी रूग्णालयांचा, विश्वस्त संस्थांच्या रूग्णालयांचा समावेश करण्यात येईल.

९. **अंमलबजावणीचे नियम :-** सदर योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते नियम करण्याची जबाबदारी राज्य आरोग्य हमी सोसायटीची राहील. तथापि, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार नियामक परिषद व शासनास राहतील.

१०. **कर्मचारी नियुक्त्यांबाबत :-** योजनांसाठी आवश्यक असणारा अधिकारी व कर्मचारी वर्ग कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटीस राहतील.

११. **खर्चाचे अधिकार :-** राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अधिकारी- कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च, कार्यालयीन खर्च आणि विमा कंपनीस अदा करावयाचा खर्च व हमी तत्वावरील दाव्यांचा खर्च अदा करण्याचे अधिकार सोसायटीस राहतील.

१२. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकारांचा व त्यांच्या कुटुंबांचा आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी कार्यान्वित असलेले बांधकाम कामगार या लाभार्थी घटकांचा समावेश करण्यात आला आहे. या घटकांची संख्या अनुक्रमे सामान्य प्रशासन विभाग व उद्योग उर्जा व कामगार विभागाने निश्चीत करून राज्य आरोग्य हमी सोसायटीस उपलब्ध करून देण्यात यावी व वेळोवेळी अद्ययावत माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटीस पुरविण्यात यावी. सदर लाभार्थ्यांसाठी होणारा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीस संबधित विभागाने/कार्यालयाने उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. तसेच योजनेमध्ये समाविष्ट अन्य घटकांशी

संबधित विभागांनी त्या घटकांची अद्ययावत आकडेवारी वेळोवेळी राज्य आरोग्य हमी सोसायटीस उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

१३. इतर तत्सम समान स्वरुपाच्या अन्य योजना संबधित विभाग/ कार्यालयाकडून राबविण्यात येत असतील तर लाभाची द्विरुक्ती टाळण्याकरिता संबधित विभागांनी त्या बंद कराव्यात तसेच संबधित विभागांनी खर्च अदा करताना द्विरुक्ती टाळण्याच्या अनुषंगाने लाभार्थ्यासंबधात तपासणी करणे आवश्यक राहील.

१४. यासाठीच्या खर्चाची रक्कम विद्यमान महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसोठी उपलब्ध असलेल्या लेखाशिर्षांतर्गत राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

१५. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे

१६.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०७२८१४०६३२४४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(मिलिंद म्हैसकर)**

**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

आयुष्मान भारत - मिशन महाराष्ट्र समिति
गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२३/प्र.क्र.३४३/आरोग्य-६**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक: ०२ नोव्हेंबर, २०२३

**वाचा :**

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दिनांक २८ जुलै, २०२३**

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये केंद्र शासनाची आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांची एकत्रित अंमलबाजवणीबाबत व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य संरक्षण रुपये ५ लाख पर्यंत वाढविण्यात आले आहे. सदरील योजने अंतर्गत महाराष्ट्रातील सामान्य जनतेला आरोग्याचा लाभ करुन देणे हा त्यांचा हक्क आहे. सदर योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबाजवणी करण्यासाठी “आयुष्मान भारत- मिशन महाराष्ट्र” समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

केंद्र शासनाची आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांची एकत्रितपणे राज्यात प्रभावीपणे अंमलजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे “आयुष्मान भारत- मिशन महाराष्ट्र” समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाम/ पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | समिती प्रमुख |
| २ | आयुक्त, राज्य कामगार योजना | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई | सदस्य |
| ४ | संचालक-१, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई | सदस्य |
| ५ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा | सदस्य |
| ७ | संचालक-२, आरोग्य सेवा, पुणे | सदस्य |
| ८ | सहाय्यक संचालक, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई | सदस्य सचिव |

२. सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे असेल,

१) सदर समिती अंतर्गत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेंतर्गत सर्व राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय समित्यांना दिशानिर्देश देणे, शिफारस करणे, अहवाल मागविणे, रुग्णालय अंगीकृत करणे, कार्यवाही करणे.

२) इतर सर्व विभाग (राष्ट्रीय आरोग्य अभियान, कामगार, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम) यांना शिफारस करणे, अंगीकृत करणे, अहवाल मागविणे, दिशानिर्देश देणे, कार्यवाही करणे.

३) निधी उपलब्धता (आयुष्मान भारत योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व सामाजिक दायित्व निधी)

४) रुग्णसेवेस चालना देण्याकरिता वैद्यकीय तज्ञाची उपसमिती करण्याचे अधिकार असेल.

३. सदर समितीचे कक्ष प्रमुख म्हणून डॉ. ओमप्रकाश सदाशिव शेटे हे कामकाज पाहतील. त्यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मानधन व इतर सोईसुविधा मिळतील.

४. सदर समितीचे कार्यालय राज्य आरोग्य हमी सोसायटी, जीवनदायी भवन, वरळी, मुंबई येथे असेल.

५. संदर्भाधीन दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदी कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३११०२१६१५४१२११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शि. म. धुळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# आरोग्य विभाग शासन निर्णय

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकिय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार निःशुल्क करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : रुशुफी-२०२३/प्र.क्र.१६७/आरोग्य-३,**

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकामन्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२३

**वाचा :-** १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकिर्ण-२०१३/प्र.क्र.४६२/ भाग-२/आरोग्य-३, दिनांक २८/१२/२०१५

२) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- आसेआ/कक्ष-३/टे-२/न. क्र.२३२१/रु.शुल्क मोफत/६५६६५/२३, दि.१२/०६/२०२३.

३) मा. मंत्रीमंडळ निर्णय दि. ०३ ऑगस्ट, २०२३ व इतिवृत्त दिनांक १८ ऑगस्ट, २०२३

**प्रस्तावना :-**

आपल्या देशात कोणतीही व्यक्ती जन्माला आली की, त्या व्यक्तीला भारताच्या राज्यघटनेमध्ये देण्यात आलेले हक्क व अधिकार आपोआपच लागू होतात. आपल्या राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांमधील कलम २१ मध्ये जगण्याचा हक्क हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. त्या अधिकारानुसार दर्जेदार, चांगले, निरोगी जीवन जगण्यासाठी अन्न, पाणी, निवारा यांबरोबरच आरोग्यदायी वातावरण, पुरेशा व नियमित आरोग्येवा यांची आवश्यकता असते.

२) भारतामध्ये प्रातिनिधिक लोकशाही असल्यामुळे, भारतातल्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा पुरवण्याची जबाबदारी पूर्णपणे लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रितिनिधींची आणि शासनाची आहे. त्याप्रमाणे आरोग्याच्या हक्कात निरोगी जीवन जगता येण्यासाठी आरोग्यकारक परिस्थिती उपलब्ध करणे; व आरोग्याची चांगली पातळी गाठता येण्यासाठी अनेक पातळीवर शासनाने आरोग्यसेवा व सोयी उपलब्ध करणे महत्त्वाचे आहे.

३) प्रत्येक भारतीय नागरिकाला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक अशा किमान आरोग्यसेवांची पूर्तता शासनाने करावी अशी माफक अपेक्षा नागरीकांची असते, राज्यातील नागरिकांना उत्तमरित्या आरोग्य सेवा देण्याकरीता आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांमध्ये संसाधने- साधनसामुग्रीची उपलब्धता, प्रशिक्षित मनुष्यबळ, औषधांची उपलब्धता, आरोग्य विषयक जनजागृती, लसीकरण, औषधोपचार असे अनेक घटक असून त्याप्रमाणे रुग्णशुल्काचा यामध्ये समावेश होत आहे. सद्यःस्थितीत आरोग्य संस्थामधील औषधे व उपचारावरील रुग्ण शुल्क निःशुल्क केल्यास सर्व वंचित, दुर्बल घटकांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १०/०७/२००१ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना पुरविण्यात येत असलेल्या वैद्यकीय सेवा, तपासणी व त्याबाबतचे शुल्काचे दर निश्चित करण्यात आले होते. सदर दरामध्ये त्यावेळी अंमलबजावणी करण्यात आलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, सार्वजनिक व खाजगी भागीदारी तत्त्वावर Radiology Imaging Diagnostics

Services यासारख्या योजनांचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच मोजक्याच तपासणी व शुल्क नमूद करण्यात आले होते. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ३१/१२/२010 च्या शासन निर्णयाप्रमाणे असलेल्या उपचार व शुल्कांच्या दराप्रमाणे आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थामध्ये वैद्यकीय सेवा, तपासणी व त्याबाबत शुल्क शासन निर्णय, सार्वजनिक विभाग, दि.२८/१२/२०१५ नुसार निश्चत करण्यात आले.

५) राष्ट्रीय आरोग्य धोरण- २०१७ मध्ये, समाजातील सर्व घटकांसाठी उत्तरोडर युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज प्राप्त करणे यामध्ये मोफत व सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे तसेच आरोग्य सेवा खर्चामुळे नागरिकांच्या खर्चात लक्षणीय घट साध्य करुन परिणामी गरीबीचे निर्मूलन करणे हे उद्दिष्ट्य साध्य होईल. त्यामुळे समाजातील अशा तळागाळातील गरजू रुग्णांच्या दृष्टीकोनातून निःशुल्क वैद्यकीय सेवा देणे हे शासनाचे कर्तव्य असल्याने त्याअनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत संस्थांमध्ये तपासणी शुल्क व उपचार निःशुल्क करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

(0१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकीय रुग्णालयामधून करणाऱ्या येणाऱ्या तपासण्या, सेवा व उपचार तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावरील वैद्यकिय सेवा (राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्क वगळून) निःशुल्क करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(0२) विभागाच्या अधिपत्याखाली शासकीय रुग्णांलयामध्ये तपासणी व रुग्णशुल्क, सेवा या निःशुल्क करण्यात आल्यामुळे संदर्भ क्र.0१ अन्वये दि.२८/१२/२०१५ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

(0३) राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्कांबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

(0४) या शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपचार व सेवा रुग्ण शुल्क निःशुल्क करण्यात आल्यामुळे रुग्णालयाच्या दर्शनी भागावर/ फलकावर याबाबत सूचना प्रदर्शित करण्यात यावे. तसेच सदर निर्णय व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कार्यवाही करावी.

(0५) तपासणी व उपचार सेवा निःशुल्क केल्यानंतर रुग्णांची/ जनतेची दिशाभूल/ फसवणूक करुन रुग्ण शुलक घेताना आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कार्यपध्दती निश्चित करावी.

(0६) सदर शासन निर्णय दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पासून अंमलात येत आहे. सदर शासन निर्णय मा.राज्य मंत्रिमंडळाची दि.0३ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र.९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

(0७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थहावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३0८२३१३२४१९१७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

[illegible]

परिपत्रक

क्र.संवैशिवसं/ज्येष्ठ नागरिक/प्रलंबित मागण्या/ /अ-६/२०२३, दि: ०९/११/२०२३

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०५.२०२३ रोजी सहयाद्री राज्य अतिथीगृह येथे पार पाडलेल्या बैठकीचे इतिवृत्त..
**ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्या.**

संदर्भ शासन पत्र क्र.वैशिवि-२०२३/सं.क्र.८४९/प्रशा-२, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी शासन पत्र व अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दिनांक १९.०६.२०२३ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

०२. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०५.२०२३ रोजी सहयाद्री राज्य अतिथीगृह येथे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्यावाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. ( इतिवृत्त संलग्नित )

| मुद्या - ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य चाचणी/तपासणी शासनामार्फत व्हावी. | |
|---|---|
| अ.क्र. | मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश |
| १. | राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये यांच्या मार्फत ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य चाचणी/तपासणी करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले. |
| २. | यासाठी सर्व ज्येष्ठ नागरिकांना आभा कार्ड देण्यात येवून त्यांना सुपर स्पेशालिटी दवाखान्यात सुध्दा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. |
| ३. | दुर्दैवाने काही आजार आढळून आल्यास त्यावर महात्मा फुले जनआरोग्य योजनामधून मोफत उपचार मिळावेत यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनामध्ये अटी व शर्ती मध्ये सर्व ज्येष्ठांमध्ये समावेश करावा. |
| ४. | ज्येष्ठ नागरिकांची राज्यातील १.५० कोटी संख्या विचारात घेता सर्व रुग्णालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या तपासणीसाठी डॉक्टर व संबंधित चाचणी /तपासण्याकरिता आठवडयातील दोन दिवस राखीव ठेवण्यास यावेत. |
| ५. | Pallative Care Ward यांची टप्प्या टप्प्यात वाढ करण्यात यावी. |

तरी, वरीलप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन अहवाल संचालनालयास तात्काल सादर करावा.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

**राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात "मुख्यमंत्री वयोश्री योजना" राबविण्यास मान्यता देणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- ज्येष्ठना-२०२२/प्रक्र.३४४/सामासु**
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०२४

**प्रस्तावना -**

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी इतकी आहे. त्यापैकी सद्यस्थितीत ६५ वर्षे व त्यावरील अंदाजित एकूण १०-१२ टक्के ज्येष्ठ नागरिक (१.२५ - १.५० कोटी) आहेत. त्यापैकी मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना कोणत्या ना कोणत्या अपंगत्वाचा सामना करावा लागतो. सदर बाब विचारात घेवून केंद्र शासनाने दारिद्रय रेषेखालील संबंधित दिव्यांग/दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांसाठी शारिरीक अक्षमतेनुसार सहाय्य साधने/उपकरणे पुरविण्याची वयोश्री योजना सुरु केली आहे. त्यानुसार अशा ज्येष्ठ नागरिकांना सक्रिय जीवनात आणण्यासाठी आणि गतिशीलता, संप्रेषण आणि मोकळेपणाने जीवन जगता यावे, यासाठी उपकरणे प्रदान करून तसेच मन:स्वास्थ केंद्र,योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ अबाधित ठेवून वयोमानानुसार अनुकूल समाज निर्माण करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनेच्या धर्तीवर राज्यात "मुख्यमंत्री वयोश्री योजना" राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात **"मुख्यमंत्री वयोश्री योजना"** राबविण्यास मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार शासन मान्यता देण्यात येत आहे.

**१. योजनेचे नाव :- <u>मुख्यमंत्री वयोश्री योजना</u>**

**२. सदर योजनेचे ध्येय व उद्दिष्ट :-**

शासन निर्णय क्रमांकः ज्येष्ठना-२०२२/प्रक्र.३४४/सामासु

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरिता एकवेळ एकरकमी रु. ३०००/- पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात थेट लाभ वितरण (D.B.T.) प्रणालीद्वारे लाभ प्रदान करणे.

**३. योजनेचे स्वरूप:-**

सदर योजनेअंतर्गत पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थतता/+ दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने/ उपकरणे खरेदी करता येतील. उदा:-

| |
|---|
| चष्मा |
| श्रवणयंत्र |
| ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर |
| फोल्डिंग वॉकर |
| कमोड खुर्ची |
| नि-ब्रेस |
| लंबर बेल्ट |
| सर्वाइकल कॉलर इ. |

तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक विभागाद्वारे नोंदणीकृत करण्यात आलेले तसेच राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगोपचार केंद्र, मन:स्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र / प्रशिक्षण केंद्र येथे सहभागी होता येईल.

**४. निधी वितरण/अर्थसहाय्य:-**

(i) राज्य शासनातर्फे १००%. अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

(ii) थेट लाभ वितरण (D.B.T.) प्रणाली द्वारे रु.३०००/- च्या मर्यादेत निधी वितरण करण्यात येईल.

(iii) शिबीराचे आयोजन करणे :-

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय यांच्यामार्फत आरोग्य यंत्रणेचे जाळे राज्याच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहे. असंसर्गजन्य रोग सर्वेक्षण (पॉप्युलेशन बेस्ड स्क्रिनिंग) व 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अभियानाअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांची सर्वेक्षण व स्क्रिनिंग घरोघरी जाऊन करण्यात येते. अशाप्रकारे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या यंत्रणेमार्फत त्या विभागाच्या सर्वेक्षणासोबत या योजनेच्या लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येईल.

५. लाभार्थ्यांची तपासणी, प्रवास, अल्पोपहार, कार्यालयीन खर्च, पात्र लाभार्थी यांची नोंदणी, दस्तावेज हाताळणी, कागदपत्र तपासणी करुन त्यांना थेट लाभ (D.B.T.) व्दारे वितरित करणे. तसेच लाभार्थ्यास लाभ प्रमाणपत्र वाटप करणे करिता प्रती लाभार्थी रू. २००/- अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**६. योजनेची अंमलबजावणी :-**

(i) ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक सहाय्य व विशेष आर्थिक सहाय्य अनुदान थेट लाभ वितरण (D.B.T.) प्रणालीद्वारे अदा करण्याकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, आयुक्त समाजकल्याण विभाग, पुणे आणि जिल्हा स्तरावरील अंमलबजावणी समिती यांचा सहभाग असेल.

(ii) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रण करेल.

**७. राज्य नोडल एजन्सी / यंत्रणा :-**

प्रस्तुत योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे इ. कामे नोडल एजन्सी/केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था (CPSU) यांच्या माध्यमातून आयुक्त, समाजकल्याण पुणे यांच्याद्वारे पार पाडण्यात येईल.

सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरीता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरीता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येईल.

अ) महानगरपालिका स्तर :

| | |
|---|---|
| अध्यक्ष :- | आयुक्त, महानगरपालिका |
| सदस्य:- | वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका,महिला व बालविकास अधिकारी |
| सदस्य सचिव:- | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण |

ब) जिल्हा स्तर :-

| | |
|---|---|
| अध्यक्ष :- | जिल्हाधिकारी |
| सह-अध्यक्ष:- | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| सदस्य - | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य विभाग, सहसंचालक/समकक्ष अधिकारी महिला व बालविकास |
| सदस्य सचिव :- | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण/जिल्हा समाजकल्याण अधिकारी |

**८. लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष :-**

अ) सदर योजनेतंर्गत लाभार्थी व्यक्ती राज्यातील ज्येष्ठ नागरिक (ज्या नागरिकांनी दि.३१.१२.२०२३ अखेर पर्यन्त वयाची ६५ वर्षे पूर्ण केली असतील, असे नागरिक पात्र समजण्यात येतील). ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधार नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. जर लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसेल, आणि स्वतंत्र ओळख दस्तऐवज असतील, तर ते ओळख पटविण्यासाठी स्वीकाराई असेल.

आ) लाभार्थी पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत किंवा राज्य/केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेन्शन योजनेअंतर्गत वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा सादर करू शकतो.

इ) उत्पन्न मर्यादा - लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.२ लाखाच्या आत असावे.याबाबतचे लाभार्थ्यांने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

ई) सदर व्यक्तीने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्त्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसावे. याबाबतचे लाभार्थ्याने स्वयं घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. मात्र दोषपूर्ण /अकार्यक्षम उपकरणे इत्यादींच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

उ) पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तीक आधार संलग्न बचत खात्यात रु. ३०००/- थेट लाभ वितरण प्रणालीद्वारे वितरीत झाल्यावर सदर योजनेअंतर्गत विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक (Invoice) प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम (CPSU) संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

ऊ) निवड / निश्चित केलेल्या जिल्हयात, लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असतील.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :**

१. आधारकार्ड /मतदान कार्ड

२. राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स

३. पासपोर्ट आकाराचे २ फोटो

४. स्वयं-घोषणापत्र

५. शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे

**९. पोर्टल तयार करणे :-**

राष्ट्रीय वयोश्री योजनेच्या धर्तीवर सदर योजनेचे नवीन स्वतंत्र पोर्टल महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून विकसित करण्यात येईल.

**१०. योजनेबद्दल जागरुकता निर्माण करणे:**

राज्य शासनाच्या मान्यतेने/सहमतीने अंमलबजावणी यंत्रणा या योजनेची व्यापक प्रसिद्धी करतील. जेणेकरुन लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये तसेच सामान्य जनतेमध्ये योजनेचे अस्तित्व आणि त्याअंतर्गत उपलब्ध असलेल्या लाभांबद्दल पुरेशी जागरूकता निर्माण होईल.

**११. नियंत्रण आणि मूल्यमापनः-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे या योजनेचे नियंत्रण केले जाईल. विभागाद्वारे या कार्यक्रमाचे मूल्यमापन अंमलबजावणीच्या एक वर्षानंतर आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचेमार्फत केले जाईल.

अर्ज प्रक्रिया, छाननी, वितरण पद्धती ई. औपचारिकता अंमलबजावणी एजन्सीव्दारे निश्चित केल्या जातील.

**१२. आर्थिक भार :-**

**(अ) थेट लाभ खर्च:-** सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी इतकी आहे. त्यापैकी सद्यस्थितीत ६५ वर्षे व त्यावरील अंदाजित एकूण १०-१२ टक्के (१.२५ - १.५० कोटी) ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यापैकी प्रायोगिक तत्वावर वृद्धापकाळाने ग्रस्त व वृद्धापकाळ संबंधीत अपंगत्वाने ग्रस्त तसेच मानसिक अस्वास्थाने पिडीत अंदाजे १२.५ ते १५ लक्ष राज्यातील ज्येष्ठ नागरीकांना या योजनेचा लाभ देणे अपेक्षित आहे. यासाठी प्रत्येक पात्र लाभार्थीमागे रु. ३००० प्रतीवर्ष एकरकमी अदा करणे अपेक्षित आहे. त्यानुसार थेट लाभ वितरण (D.B.T.) करिता [ १५,००,००० x ३००० = ४५०,००,००,०००] (अक्षरी रुपये चारशे पन्नास कोटी फक्त) इतका कमाल अंदाजित खर्च असेल.

**(ब) नोडल एजन्सी खर्च :-**

प्रती लाभार्थी खर्च रुपये २००/- प्रमाणे (१५,००,००० x २०० = रु.३०,००,००,०००/-) (अक्षरी रुपये तीस कोटी फक्त) इतका कमाल अंदाजित खर्च असेल.

अंमलबजावणी संस्था, नोडल एजन्सी / केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था (CPSU) यांच्याद्वारे लाभार्थी संबंधीत सर्व कामे व थेट लाभ वितरण (D.B.T.) प्रक्रिया द्वारे पार पाडून होईल.

**कामांचे स्वरूप :-**

पात्र लाभार्थ्यांची कागदपत्रे तपासणी

आधार प्रमाणीकरण

बँक खाते व आधार जोडणी

विभागाशी समन्वयन करणे
देय रक्कम थेट लाभ वितरण (DBT) द्वारे खात्यात वळती करणे.

**(क) शिबीर आयोजन :-**

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय यांच्यामार्फत आरोग्य यंत्रणेचे जाळे राज्याच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहे. असंसर्गजन्य रोग सर्वेक्षण (पॉप्युलेशन बेस्ड स्क्रिनिंग) व माझे कुटुंब माझी जबाबदारी अभियानाअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांची सर्वेक्षण व स्क्रिनिंग घरोघरी जाऊन करण्यात येते. अशाप्रकारे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या यंत्रणेमार्फत त्या विभागाच्या सर्वेक्षणासोबत या योजनेच्या लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येईल.

सदर योजनेकरिता प्रस्तावित खर्च पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | तपशील | प्रस्तावित खर्च (रक्कम लक्ष मध्ये ) |
|---|---|---|
| १ | थेट लाभ वितरण खर्च (१५ लाख लाभार्थी यांना प्रति रु. ३ हजार प्रमाणे) | ४५०००.०० |
| २ | नोडल एजन्सी खर्च | ३०००.०० |
| ३ | शिबीर आयोजन खर्च | ००.०० |
| | एकूण | ४८०००.०० |

**(अक्षरी रक्कम रू.चारशे ऐंशी कोटी फक्त)**

**१३. लेखापरीक्षण:-**

अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीचे खाते संदर्भात वेळोवेळी सुधारित केलेल्या जनरल फायनान्स रुल (G.F.R.२०१७) च्या तरतुदीनुसार लेखापरीक्षणाच्या अधीन असतील.

**१४.** सदर योजनेकरिता वार्षिक अंदाजे रू.४८०.०० कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेच्या खर्चासाठी स्वतंत्रपणे लेखाशिर्ष घेण्यात येईल. सद्यःस्थितीत मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गतचा सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील खर्च भागविण्यासाठी या विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" (लेखाशिर्ष २२२५-एफ-०८५) या राज्यस्तरीय योजनेमधील अर्थसंकल्पीत निधी "मुख्यमंत्री वयोश्री योजने" करिता पुनर्विनियोजनाद्वारे या विभागाच्या "वृध्द व अपंगासाठी गृहे" या योजनेतंर्गतच्या २२३५-१४३२ या लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध करण्यात येईल.

**१५.** सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ प्रमाणे इतर सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे असतील.

**१६.** सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि.०५ फेब्रुवारी,२०२४ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा सांकेतांक २०२४०२०६१९४३३४४७२२ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.


महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,


**सहपत्र- परिशिष्ट- १ & २**

( रविंद्र गोरवे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# पुस्तक परिचय




धुळ्याचे प्रा. आबा नथु पाटकरी (आधारस्तंभ वर्गणीधारक क्र. १५८८) यांची २०१९ मध्ये प्रकाशित 'जीवनसंध्या' आणि २०२४ मध्ये प्रकाशित 'विविधा' ही दोन पुस्तके पाहिली आणि वाचली. निवृत्तीनंतर ज्येष्ठांना त्यांच्या उर्वरीत जीवनात पुस्तक रुपाने आनंद मिळवून देणेचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. 'विविधा' (लेखमाला) पुस्तकात विविध प्रसंगी विविध दैनिकात/साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या लेखांचा अंतर्भाव आहे. जीवनाची सार्थकता, उतारवयातील सकारात्मक विचारासंबंधी तसेच माणसाने जगावे किती व कां? जगण्याची कला या विविध विषयांवरील लेखांचा अंतर्भाव 'जीवनसंध्या' या पुस्तकात असून ते ज्येष्ठांना मार्गदर्शक आहेत. दोन्ही पुस्तकांबाबत लेखकाचे अभिनंदन.

– संपादिका

**चैतन्यनगर ज्येष्ठ नागरिक संघ जळगाव –**

फेस्कॉम चे माजी अध्यक्ष मा.डी.टी. चौधरी यांचे अध्यक्षतेखाली संघाचा कार्यक्रम संपन्न झाला.संघाचे अध्यक्ष अॅड. अरूण धांडे यांनी निरोगी आनंदी दीर्घायुष्य, सौ.आशाताई तुटले, अंजली चौधरी, मंजुषा राव, अविनाश राव यांनी गायन, रामव्दारा जळगाव सतगुरू सुखारामजी महाराज केवलधाम तर्फे सत्संग कार्यक्रम, मंगल खोंडे यांनी मानवी जीवन उध्दार, मुक्ती, ध्यानबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती कौतुकास्पद होती.

---

**फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल – कायदेशी कार्यशाळा**

फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल चे वतीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सांगली वकील बार संघटना यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालयात ज्येष्ठ नागरिकासाठी कायदेविषयक शिबीर संपन्न झाले. याप्रसंगी अॅड. अमोल डोंबे, पॅनेल विधिज्ञ यांनी ज्येष्ठ नागरिकांचे कायदे व अधिकाराबरोबरच आईवडील व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ पालनपोषण कायदा २००७, नियम २०१० बाबत विस्तृत माहिती विषद केली. अॅड. गौरी पोतदार, पॅनेल विधीज्ञ यांनी कौटुंबिक हिंसाचार व महिला अत्याचार कायदा व त्यातील तरतुदीबाबत माहिती दिली. सदरचे कायदेविषयक शिबीर मा.श्री. प्रविण नरडेले, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सांगली तथा दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, यांचे अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. ज्येष्ठ नागरिकांच्या विविध शंकांचे निराकरण करणेत आले. सूत्रसंचलन विधी सेवा प्राधिकरणाचे श्री. नितीन आंबेकर यांनो केले. सांगली मिरजेबरोबरच विविध तालुक्यातील १२५ ज्येष्ठ नागरिकांनी शिबीराचा लाभ घेतला. या प्रसंगी ७ ज्येष्ठ नागरिक मनोहारी मनोयूवा मासिकाचे वर्गणीदार झाले.

* * *

**सन २०२४–२५ सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत फेस्कॉम अध्यक्ष यांची प्रतिक्रिया**

दि. १ फेब्रुवारीला, 'अमृतकुंभाचा अंतरिम संकल्प' या गोंडस नावाखाली केन्द्र सरकारच्या अर्थमंत्री मा. निर्मला सितारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. त्यात परत नेहमीप्रमाणेच ज्येष्ठांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

१) लॉकडाऊन काळात ज्येष्ठ नागरिकांचे रेल्वेचे कन्सेशन काढून घेतले होते, ते परत चालू करणेबाबत फेस्कॉमने अर्थ मंत्रालय, रेल्वे मिनिस्टर, अश्विनी वैश्णव, पंतप्रधान कार्यालय, महाराष्ट्रातील ४८ खासदार, या सर्वांना ईमेल केले, समक्ष भेटून निवेदने सादर केली, परंतु या अंतरिम अर्थसंकल्पात रेल्वे कन्सेशन बाबत काहीच तरतुद केली गेली नाही.

२) ज्येष्ठांच्या आर्थिक लाभाच्या योजनेंतर्गत दरमहा रु. २००/ केन्द्र सरकार राज्यांना देत होते, ते ही आता दिले जात नाही. त्या बाबतही तरतुद केलेली नाही.

३) ज्येष्ठ नागरिकांच्या अनक्लेम्ड डिपॉझिटच्या एक लाख दहा हजार कोटीच्या रकमा रिझर्व्ह बँकेत पडुन आहेत, त्यांचा ज्येष्ठांच्या कल्याणासाठी वापर करण्यात यावा यासाठी एक ट्रस्ट स्थापन करण्यात आला, त्यातून आर्थिक लाभाच्या योजनां बाबत उल्लेख केलेला नाही.

४) ज्येष्ठांच्या आरोग्या संदर्भात नवीन योजनांवर भर दिलेला नाही.

एकुणच भारतात १५ कोटीचे वर ज्येष्ठ नागरिक असताना, ज्येष्ठांच्या साठी स्वतंत्र मंत्रालय देखील नाही. हे सर्व व्होटर्स, मतदार आहेत, पण अतिशय दुर्लक्षित घटक मानला जात आहे. राज्यकर्त्यांनी याची जाणीव ठेवून, ज्येष्ठांच्या समस्येवर विचार केला पाहिजे. आता बजेट वरील चर्चेत ज्येष्ठांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यात यावेत.

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)




## मा. ना. श्री. एकनाथराव शिंदेसाहेब

(मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांना

वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



- शुभेच्छुक -

**श्री. आण्णासाहेब टेकाळे**
**व कुटुंबिय**

उपाध्यक्ष, अखिल भारतीय वरिष्ठ महासंघ
उपाध्यक्ष, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ


**Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732**
**Postal Licence Reg. No. : SGL/133/2024-2026**

**मनोहारी मनोयुवा मासिक वर्गणी दर**
**(दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत)**

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | - ३००/- |
| द्विवार्षिक वर्गणी | - ५२०/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | - ८५०/- |
| पंचवार्षिक वर्गणी | - १३००/- |
| आधारस्तंभ (फोटो व परिचय सह) | - २०००/- |

**दि. १ एप्रिल २०२४ पासून सुधारित**
**मनोहारी मनोयुवा मासिक वर्गणी दर**

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | - ३५०/- |
| द्विवार्षिक वर्गणी | - ६००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | - ९००/- |
| पंचवार्षिक वर्गणी | - १३५०/- |
| आधारस्तंभ (फोटोसाठी रु. ५००/- जादा) | - २५००/- |
| संघाच्या विविध कार्यक्रमाचे फोटो (रंगीत, आकार 3" x 2") | - ५००/- |






सांगली जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन चे वतीने पेन्शनर्स डे निमित्त निवृत्त सेवक एकात्मता दिन कार्यक्रम प्रसंगी मनोयुवा कौन्सिल चे प्रसार माध्यम अधिकारी मा.रंगराव शिंपुकडे यांचे समवेत अध्यक्ष सुरेंद्र पेंडूरकर , राजन औंध,दिलीप पाटील, बसले सर,अंजुमन खान व पदाधिकारी

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,
_______________
_______________
_______________